**<u>नियमित दिवाणी दावा क्र. १४/२०२४</u>**

## आदेश निशाणी क्र.२० वर

प्रस्तूत अर्ज प्रतिवादी क्र. १ तर्फे त्यांच्या विरुध्द झालेले विना कैफियत आदेश रद्द करण्यात येवून त्यांची कैफियत अभिलेखावर दाखल करण्यास परवानगी मिळण्यासाठी दाखल केला आहे. प्रतिवादीच्या कथनानुसार तो वयोवृध्द असुन त्याची स्मरणशक्ती कमी झाल्याने दावा मिळकतीबाबतची माहिती वेळेत न मिळाल्यामूळे कैफियत दाखल करण्यास विलंब झाला आणि त्यांच्या विरुध्द विना कैफियतीचा आदेश पारीत झाला आहे. सबब अर्ज मंजूर करण्याची विनंती प्रतिवादी यांनी केली आहे.

२. प्रस्तूत अर्जावर म्हणणे दाखल करुन प्रतिवादींचा अर्ज मंजूर करण्या करण्यास वादींनी विरोध दर्शविला आहे. प्रतिवादींचा अर्ज खरा व बरोबर नाही, असे आक्षेप नोंदवुन अर्ज नामंजुर करण्याची मागणी केली आहे.

३. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला, अर्ज, त्यावरील म्हणणे आणि अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तूत दावा हा सन २०२४ मध्ये दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. १ याने त्याची कैफियत मुदतीत दाखल न केल्याने त्यांच्या विरुध्द विना कैफियतीचा आदेश पारीत करण्यात आला. तदनंतर दिनांक १६.१२.२०२४ रोजी प्रस्तूत अर्जाद्वारे दाव्यास कैफियत दाखल करण्याची तयारी दर्शविली आहे. परंतू प्रतिवादी यांनी कोणती कागदपत्रे मिळविण्याकरीता त्यांना कैफियत दाखल करण्यास विलंब झाला, त्या कागदपत्रांचा तपशील नमूद केला नाही अथवा विलंबाचे योग्य ते कारण स्पष्ट केले नाही. प्रस्तूतचा दावा हा वाटप होवून कब्जा मिळण्यासाठी दाखल केला असल्याने दाव्याचा गुणदोषावर निकाल होण्यासाठी प्रतिवादीचा सहभाग आवशक आहे. सबब झालेल्या विलंबासाठी योग्य ते कॉस्ट लावून प्रतिवादी क्र. १ यांना संधी देणे उचित होईल. सबब मी खालील प्रमाणे आदेश पारीत करत आहे.

### -|| आदेश ||-

१. प्रतिवादी क्र. १ यांनी कॉस्ट ₹१००/- वादी यांना देण्याच्या अटीवर अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२.	प्रतिवादी क्र. १ यांनी उपरोक्त कॉस्ट भरल्यानंतरच दाव्यास त्याची कैफियत अभिलेखावर दाखल करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

**ए.एस.सोनवलकर**
**४ थे सह दिवाणी न्यायाधिश, क.स्तर.**
**पंढरपूर**

**दिनांक २२.०४.२०२५.**